# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

बैठक क्रमांक : 170

स्थळ : प्रशासकीय इमारत
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक, 422 222

वार व दिनांक : शुक्रवार , दिनांक : 18 ऑक्टोबर, 2019

वेळ : सकाळी 11:30 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

170 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, शुक्रवार, दिनांक 18 ऑक्टोबर 2019 रोजी सकाळी 11:30 वाजता, प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा प्रा.ई वायुनंदन, कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा.डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू,नाशिक — सदस्य
3. मा.डॉ.आशिष पातुरकर, कुलगुरू, नागपूर — सदस्य
4. मा. डॉ.अनिल कुलकर्णी, पुणे — सदस्य
5. मा.श्री. हेमंत आंबासेलकर, नागपूर — सदस्य
6. मा.डॉ.सचिन मांडवगणे, नागपूर — सदस्य
7. मा.डॉ. हरिहर कौसडीकर, मा. सचिव, कृषी, मुंबई यांचे प्रतिनिधी — सदस्य
8. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव — सचिव
9. प्रभारी वित्त अधिकारी, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक — निमंत्रित

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

10. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
11. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
12. मा. संचालक (शिक्षण), पुणे — सदस्य
13. मा.संचालक,व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण — सदस्य
14. मा.श्री.ज्ञानदेव नाठे, संचालक, तंत्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी — सदस्य
15. मा.प्रा. कपिलकुमार, नवी दिल्ली — सदस्य
16. मा.आमदार श्रीमती देवयानी फरांदे — सदस्य
17. मा.आमदार श्री.बाळासाहेब सानप,नाशिक — सदस्य

| क्र. | ठराव क्र. | तपशील |
|---|---|---|
| 170.1.0 | 170.1.1 | स्वागत |
| 170.2.0 | 170.2.1 | दि. 29 मार्च 2019 रोजी झालेल्या 168 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**- दि. 29 मार्च 2019 रोजी झालेल्या 168 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |
| | 170.2.2 | दि. 11 एप्रिल 2019 रोजी झालेल्या 169 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**- दि. 11 एप्रिल 2019 रोजी झालेल्या 169 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |
| | 170.2.3 | दि. 29 मार्च 2019 रोजी झालेल्या 168 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**-दि. 29 मार्च 2019रोजी झालेल्या 168 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. तसेच ठराव क्र.168.5.3 नुसार विद्यापीठातील परिसरातील विविध ठिकाणी R.O./U.V Plant मधील पाण्याचे Quality Testing दर दोन ते तीन महिन्यांनी करावे असे निर्देश देण्यात आले. |
| | 170.2.4 | दि. 11 एप्रिल 2019 रोजी झालेल्या 169 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या बैठकीतील |

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**- दि दि. 11 एप्रिल 2019 रोजी झालेल्या 169 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली |
| | 170.2.5 | Commonwealth of Learning, Canada यांच्याकडून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सन 2019 मध्ये Excellence Award for Institute हा पुरस्कार मिळाल्याबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 09 ते 12 सप्टेंबर, 2019 या कालावधीत एडिनबर्ग, स्कॉटलंड येथे Commonwealth of Learning, Canada यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेमध्ये दि. 11 सप्टेंबर, 2019 रोजी Commonwealth of Learning, Canada यांच्याकडून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सन 2019 मध्ये Excellence Award for Institute हा पुरस्कार व सन्मानचिन्ह प्राप्त झाले. या कार्यक्रमास विद्यापीठाच्या वतीने मा. कुलगुरू व मा. कुलसचिव उपस्थित होते.<br>मा. कुलगुरू यांनी विद्यापीठास मिळालेल्या सन्मानपत्राचे वाचन केले. तसेच सदरील पुरस्कार हा विद्यापीठास दोन वेळा मिळाल्याचेही नमूद केले. याबाबत व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी विद्यापीठ व विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांचा अभिनंदनाचा ठराव पारित केला. |
| 170.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 170.3.1 | विद्यापीठातील शिक्षकांच्या सन 1990 ते 1997या कालावधीत रजा रोखीकरणाबाबतची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - वरील विषयासंदर्भात उच्च न्यायालय, मुंबई येथेडॉ.अनुराधा देशमुख यांची रजा रोखीकरणाबाबतची याचिका न्यायप्रविष्ट असल्यामुळे सदरील याचिकेचा निकाल जाहीर आल्यानंतर पुढील कार्यवाही करावी यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.2 | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक व टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांच्यात दिव्यांगांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी सुविधा यासाठी सामंजस्य कराराची (MOU)बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक व टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांच्यात दिव्यांगांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी सुविधा यासाठी सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.3 | Grassroot Innovation Centre in VNIT,Nagpur &YCMOU सामंजस्य करार (MOU)करण्याची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - Grassroot Innovation Centre in VNIT, Nagpur & YCMOU सामंजस्य करार (MOU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.4 | कृषी विज्ञान केंद्राचे प्रशिक्षण संयोजक/वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख या पदांसाठी व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार करियर अडव्हान्समेंट योजना (CAS)लागु करण्यासाठी मूल्यमापन समिती गठन करणेबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - कृषी विज्ञान केंद्राचे प्रशिक्षण संयोजक/वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख या पदांसाठी व्यवस्थापन मंडळ ठरावानुसार करियर अडव्हान्समेंट योजना (CAS)लागु करण्यासाठी मूल्यमापन समिती गठन करण्यास समिती सदस्य निवडीचे अधिकार मा.कुलगुरु यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.5 | सन 2012 मध्ये खरेदी केलेले लॅपटॉप निर्लेखनाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - सन 2012 मध्ये खरेदी केलेले लॅपटॉप निर्लेखनाबाबत शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती/07/प्र.क्र.89/39 दि.4 जाने 2008 मधील मुद्दा क्र. 6 – निर्लेखित केलेली उपकरणे मुद्दा क्र. 2 मधील किंमतीवर घेण्याचा प्रथम हक्क निर्लेखनापूर्वी ती उपकरणे ज्याच्या वापरात होती त्यांचीच राहील याबाबतचे आदेश संबंधीत विभागातील सक्षम अधिकारी बजावतील. मात्र ज्या उपकरणाचा वापर एका व्यक्तीकडून होत नसून पूर्ण विभागासाठी होत असल्यास अशा उपकरणाबाबतचा हक्क संबंधीत विभागातील प्रमुख ठरवेल व ज्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रथम हक्क देण्यात आला त्याने उपकरणे घेण्यास |

नकार दिला त्याबाबतचा हक्क संबंधीत विभाग प्रमुखाने त्या विभागातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना लेखी आदेश काढून द्यावा व हे उपकरण घेण्यास कोणीही तयार नसल्यास निविदा पद्धतीने विलेव्हाट लावावी अशी तरतूद आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास तसेच संगणक विभागाने खरेदी केलेल्या 90 उपकरणांच्या -1) Dell Latitude E 6200 – रु. 3400/- 2) Dell Latitude E 5420 – रु. 2400/- याप्रमाणे प्रस्तावित किंमत (दुप्पट) घेऊन पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

170.3.6 विद्यापीठाच्याकृषी विज्ञान केंद्रातील तांत्रिक पद संवर्गातील पदांवरील कर्मचा-यांना भाकृअपनुसार करियर अडव्हान्समेंट योजना(CAS)लागू करणेसाठी झालेल्या मुल्यमापनानंतर प्राप्त शिफारशी लागु करण्याबाबतची बाब

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाच्याकृषी विज्ञान केंद्रातील तांत्रिक पद संवर्गातील पदांवरील कर्मचा-यांना भाकृअपनुसार करियर अडव्हान्समेंट योजना(CAS)लागू करणेसाठी झालेल्या मुल्यमापनानंतर प्राप्त शिफारशी लागु करण्याबाबत ICAR च्या Guidelines नुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

170.3.7 दि. 9 मार्च 2019रोजी झालेल्या तक्रार निवारण (Grivenace Committee) समितीचे निर्णयाबाबतची बाब

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दि. 9 मार्च 2019रोजी झालेल्या तक्रार निवारण (Grivenace Committee) समितीच्या निर्णयाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| क्र | अर्जदार | तक्रारीचे स्वरुप | समिती अभिप्राय | व्यवस्थापन मंडळ ठराव |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रा.वाडेकर नागार्जुन मारुती | दि.13.10.2013 रोजी स्टेज 3 मधुन स्टेज 4 ग्रेड वेतन 9000/-मध्ये पदोन्नतीस पात्र असतांना पदोन्नती झालेली नाही | वरील विवेचनावरुन श्री वाडेकर यांची CASनुसार वेतननिश्चिती झालेली आहे. त्यानुसार वेतनही अदा करण्यात येत आहे.सदरील प्रकरण निकाली काढण्यात येत आहे. | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. |
| 2 | डॉ.सुरेश विठ्ठल पाटील | अध्यापकाचे नियमित पद रिक्त ठेवून सात वर्षे अल्प वेतनावर काम करवून घेतले. CAS साठी ती सेवा ग्राह्य धरली नाही. | वरील विवेचनावरुन डॉ.सुरेश पाटील, सहयोगी प्राध्यापक सन 1993पासून विद्यापीठात करार पध्दतीने एकत्रित वेतनावर सेवेत होते. याबाबतसर्व कागदपत्र टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. |
| 3 | डॉ.जयदिप दौलतराव निकम | सहाव्या वेतनानुसार नियुक्ती दिनांकापासून सहयोगी प्राध्यापक पदनामावर पदस्थापना | वरील विवेचनावरुन डॉ.जयदिप निकम यांनी सादरकेल्याची कागदपत्रांसह त्यांचे प्रकरण योग्य त्या | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | निर्णयार्थ संचालक/ सहसंचालक,उच्च शिक्षण यांच्याकडे पाठविण्यात यावे असे ठरले | | |
| | | 4 | श्री.राम आशाबाई ठाकर | मागील सेवा सोडून (नियुक्ती दिनांकापासून) मिळणे<br>एम.टेक. वेतनवाढ फरक<br>प्रलंबित CAS | वरील विवेचनावरुन श्री.ठाकर विद्यापीठात नियुक्ती होण्यापुर्वी एम.टेक.पदवीप्राप्त केली आहे.एम.टेक नियमान्वये मिळणा-या दोन आगावू वेतनवाढी नियुक्तीच्या दिनांकापासून अदा करण्यासाठी दि. 4.9.2015च्या कार्यालयीन आदेशान्वये वित्त विभागास कळविले आहे. वित्त विभागाने सप्टे 2015पासून सदर दोन आगावू वेंतनवाठी अदा केलेल्या दिसून येतात. वेतनवाढीमुळे थकबाकी दिलली नाही. याबाबत माहिती सादर करण्यात यावी .तसेच CAS अंतगर्त पदोन्नती व वेतननिश्चिती हे CAS समितीशी संबंधीत असल्यामुळे याबाबत नियोजित CAS समितीकडून कार्यवाही केली जाईल. | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. | |
| | | 5. | श्री.अवचट संजयकुमार | प्रथम नियुक्ती दुरूस्ती व त्यानुसार पदोन्नती | वरील विवेचनावरुन श्री.संजय अवचट यांचीसुरुवातीपासुनची सर्व कागदपत्रे पाहून सविस्तर टिपणी पुढील बैठकीत सादर करावी असे ठरले. | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. | |
| | | 6 | श्रीमती सुचिता शिवाजी बेरड | मी 22 दिवसांची रजा घेतलेली असतांना ती 23 दिवसांची परिगणित | समितीत झालेल्या चर्चानुसार करारावरील सेवेच्या | तक्रार निवारण समिती अभिप्रायास | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करण्यात आली आहे. | काळातील रजा बरोबर आहे.श्रीमती बेरड ह्या प्रथम नियुक्तीच्या सरळसेवेच्या सहायक पदावर सोमवार दि. 2 जानेवारी 1995 रोजी रुजू झालेल्या आहेत. त्यांचा नियुक्ती दिनांक बरोबर आहे. त्यामुळे सदर प्रकरण निकाली काढण्यात येत आहे. | मान्यता देण्यात आली. |
| 7 | चव्हाण गणेश यशवंत | कक्ष अधिकारी पदाच्या पदोन्नतीबाबत आळीपाळीने अनुसुचित जमाती प्रवर्गास पदोन्नती मिळणेबाबत दि. 26.10.2004च्या शा.नि.क्र.बीसीसी/2001/1887/प्रक्र64/01/16 व मधील तरतुदीनुसार | समितीत झालेल्या चर्चेनुसार श्री.चव्हाण यांच्यासंदर्भात पदोन्नतीबाबत निर्णय देतांना पदोन्नतीची पदे भरण्यासंदर्भातमा.उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्या अनुषांगिक शासकीय धोरणानुसार व निर्गमित शासननिर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षित पदे भरण्याची नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. |
| 8 | वनिता श्रीकृष्ण रोडगे | Pay-Scale मिळणेबाबत | सध्या विद्यापीठास शासन निर्णयानुसार मंजुर केलेली वेतनश्रेणी लागु करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले. | सदरील प्रकरण पुन्हा चर्चेसाठी व्यवस्थापन मंडळ बैठकीत ठेवण्यात यावे असे मा.कुलगुरु यांनी निर्देशित केले. |
| 9 | पवार चंद्रकांत सुरेश | सहायक कुलसचिव अ.जा.संवर्ग पदोन्नती देतांना झालेला अन्याय | पद रिक्त होण्याच्या दिवसापासून मानीव दिनांक दिल्यास इतर तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे पदोन्नती कार्यवाहीचा 1महिन्याचा कालावधी गृहीत धरुन | सदरील प्रकरण पुन्हा चर्चेसाठी व्यवस्थापन मंडळ बैठकीत ठेवण्यात यावे असे मा.कुलगुरु यांनी निर्देशित केले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 1महिन्याचा कालावधी नंतर पदोन्नती देण्यात यावी असे ठरले. | |
| 10 | परेश अशोक शिउरकर | दि.7 मार्च 1990 विद्यापीठ वेतनश्रेणीवर असतांना शासन निर्णयानुसार सेवत वेतनश्रेणीवर घेतले नाही डावलण्यात आले. | समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार या प्रकरणांसदर्भात एक समिती स्थापन करावी.समितीच्या शिफारशीसाठी अहवाल पुढील बैठकीत सादर झाल्यानंतर यावर निर्णय घेण्याचे ठरले. | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. |
| 11 | 1) परेश अशोक शिउरकर<br>सुनिल निकम<br>मधकर खांडेकर<br>आनंद बर्वे<br>दिलीप मोरे | सन 1991पासून विद्यापीठात दैनंदिन कार्यरत होते. 1991 च्या जाहीरातीनसार नियमित वेतनश्रेणीतील सहायक पदावर नियुक्तीसाठी प्रतिक्षा यादी तयार केली. डिसेंबर 1991मध्ये सहायक पदावर नियुक्ती देतांना नियमित वेतनश्रेणीएवजी करारावर एकत्रित वेतनावर नियुक्त्या दिल्या. त्यानंतर मार्च 1993पासून नियमित (950-1500)या वेतन श्रेणीत सहायक पदावर नियुक्ती आदेश दिले. औद्योगिक न्यायालयात आमच्या बाजुने निकाल दिला असुन त्यानुसार डिसेंबर 1991 मधील रुजु दिनांकापासून नियुक्ती धरुन त्या अनुषंगाने येणारे सर्व आर्थिक फायदे,रजा इ.सवलती देण्यात याव्यात.तक्रार निवारण समितीच्या विहीत नमुन्यात तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही. परंतु यापूर्वीच्या तक्रार निवारण समितीत सदर तक्रार नोंद केली आहे. | समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रकरण यापुर्वी कायदेशीर असल्यामुळे सदर प्रकरणे वकीलाकडे पाठवुन अभिप्राय घ्यावेत व अहवाल पुढील बैठकीत सादर झाल्यानंतर यावर निर्णय घेण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला. | तक्रार निवारण समिती अभिप्रायास मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 170.3.8 | नाशिक येथील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द बातम्यामधील सत्यता पडताळणी समितीच्या अहवालावर कार्यवाही सुचविण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीतील सदस्य डॉ.कपिलकुमार यांच्याऐवजी अन्य सदस्याची नेमणूक करण्याबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - नाशिक येथील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द बातम्यामधील सत्यता पडताळणी समितीच्या अहवालावर कार्यवाही सुचविण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीतील सदस्य डॉ.कपिलकुमार यांच्याऐवजी व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी यांची नेमणुक करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.9 | दृकश्राव्य केंद्रातील तांत्रिक व व्यावसायिक पदांचे परिनियम तयार करणेकामी समितीद्वारे तयार केलल्या मसुदा परिनियमास व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दृकश्राव्य केंद्रातील तांत्रिक व व्यावसायिक पदांची नियुक्ती,त्यासाठी शैक्षणिक पात्रता,पदांचे कर्तव्य,जबाबदा-या,पदोन्नतीचे नियम व धोरणे ठरविणे, सेवेच्या शर्ती ठरविणेसाठी परिनियम तयार करण्यासाठी प्रा.अंबादास मोहीते यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीचा अहवाल व्यवस्थापन मंडळ बैठकीत सादर करण्या आला. सदरील परिनियम अहवाल विधी सदस्य असलेल्या समितीकडून तपासून घेऊन पुढील बैठकीत सादर करण्यात यावा यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.10 | शासनाच्या दि. 13 ऑगस्ट 2019 व दि. 17 सप्टेंबर 2019 पत्रान्वये विद्यापीठातील कर्मचा-यांच्या नियुक्त्यांमधील अनियमितता शिथिल करणेबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**- शासनाच्या दि. 13 ऑगस्ट 2019 व दि. 17 सप्टेंबर 2019 पत्रान्वये विद्यापीठ कर्मचा-यांच्या नियुक्त्यांमधील अनियमितता शिथिल करणेबाबत व्यवस्थापन मंडळास अधिकार देण्यात आले आहेत परंतु याबाबत योग्य तो निर्णय घेण्यापूर्वी समिती स्थापन करावी असे व्यवस्थापन मंडळ सदस्य मा.डॉ.आशिष पातुरकर यांनी सुचविले. यास अनुसरुन समिती सदस्य नियुक्तीचे अधिकार मा.कुलगुरू यांना प्रदान करण्यात यावे यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 170.3.11 | दि. 25 सप्टेंबर 2019 रोजी झालेल्या वित्त समिती कार्यवृत्तातील विषय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर |
| | | 1)सन 2015-16, 2016-17 व 2017-18 च्या लेखा परीक्षण अहवालास मंजुरी देणेबाबत<br>**वित्त समिती ठराव क्र.** 14.3.2 - सन 2015-16, 2016-17 व 2017-18 च्या लेखा परीक्षण अहवालास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारस करावी असे ठरले<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – सन 2015-16, 2016-17 व 2017-18 च्या लेखा परीक्षण अहवालास वित्त समितीच्या शिफारशीनुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | | 2) विद्यापीठासाठी Tally Software खरेदी, Customization व Provision for accounting & Internal Auditing work of Regional Centres & University मंजुरी देणेबाबत व त्यासाठी येणा-या अंदाजे 50 लक्ष इतक्या खर्चास मंजुरीबाबत<br>**वित्त समिती ठराव क्र.** 14.3.3- विद्यापीठासाठी Tally Software खरेदी, Customization व Provision for accounting & Internal Auditing work of Regional Centres & University साठी येणा-या अंदाजे 50 लक्ष खर्चास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारस करावी असे ठरले<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्यापीठासाठी Tally Software खरेदी, Customization व Provision for accounting & Internal Auditing work of Regional Centres & University साठी येणा-या अंदाजे 50 लक्ष खर्चास वित्त समितीच्या शिफारशीनुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | | 3) दिनांक 6.3.2019, 4.4.2019, 1.8.2019 रोजी झालेल्या खरेदी समित्यांचे इतिवृत्त मंजुरीस्तव सादर<br>**वित्त समिती ठराव क्र.** 14.3.4- दिनांक 6.3.2019, 4.4.2019, 1.8.2019 रोजी झालेल्या खरेदी समित्यांचे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारस करावी असे ठरले |

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दिनांक 6.3.2019, 4.4.2019, 1.8.2019 रोजी झालेल्या खरेदी समित्यांचे इतिवृत्तास वित्त समितीच्या शिफारशीनुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

4) सन 2018-19 चे वित्तीय वर्षात विद्यापीठातील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरीस्तव सादर

**वित्त समिती ठराव क्र. 14.4.1**- विद्यापीठातील

1) नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मागील वर्षाप्रमाणे म्हणजे - रु. 30,000/-
2) करारावरील कर्मचा-यांना त्यांचे एक वेतन किंवा जास्तीत जास्त रु. 22,000/-
3) सफाई,सुरक्षा व इतरांसाठी रु. 5,000/- इतके सानुग्रह अनुदान द्यावे.

उपरोक्त सानुग्रह अनुदान देतांनी दि. 30 सप्टेंबर 2019 पर्यंत ज्या कर्मचा-यांना सहा महिने पूर्ण झालेले असतील त्यांना देय राहिल

वरीलप्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करण्यास मंजुरीसाठी व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठातील नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कर्मचारी, करारावरील कर्मचारी व सफाई, सुरक्षा व इतर यांना खालीलप्रमाणे

1) नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मागील वर्षाप्रमाणे म्हणजे - रु. 30,000/-
2) करारावरील कर्मचा-यांना त्यांचे एक वेतन किंवा जास्तीत जास्त रु. 22,000/-
3) सफाई,सुरक्षा व इतरांसाठी रु. 5,000/- इतके सानुग्रह अनुदान द्यावे.

सानुग्रह अनुदान देण्याच्या वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

5) 1) विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विविध सेवा शुल्कात वाढ करणेबाबत 2) अंतर्गत गुण मुदतीत सादर न करणा-या अभ्यासकेंद्रांना करावयाच्या दंडात्मक तरतुदीबाबत

**वित्त समिती ठराव क्र. 14.4.3** - 1) विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विविध सेवा शुल्कात वाढ करण्याबाबत तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सेवा शुल्क **Hand Delevery** व टपाल खर्चासह एकच सुधारीत दर असावा तो तक्त्यातील टपाल खर्चात दर्शविल्याप्रमाणे मंजुर करण्याबाबत व्यवस्थापन मंडळास मंजुरीस्तव शिफारस करावी असे ठरले

2) परीक्षा मंडळाने सुचविलेली दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत व्यवस्थापन मंडळास मंजुरीस्तव शिफारस करावी असे ठरले

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विविध सेवा शुल्कात वाढ करण्याबाबत तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सेवा शुल्क **Hand Delevery** व टपाल खर्चासह एकच सुधारीत दर असावा तो तक्त्यातील टपाल खर्चात दर्शविल्याप्रमाणे मंजुरीस तसेच

2) परीक्षा मंडळाने सुचविलेली दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतच्या वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली

6) विद्यापीठातील विविध विभागात संगणक व प्रिंटर्स खरेदी करण्यासाठी व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत

**वित्त समिती ठराव क्र. 14.4.4** – सन 2019-20 या आर्थिक वर्षात Purchase of Computers या लेखाशीर्षाखाली रु. 50 लाख तरतूद करण्यात आली असल्यामुळे 50 लाखांपर्यंत खरेदी करावी उर्वरीत खरेदी पुढील आर्थिक वर्षात करावी त्यास मंजुरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - सन 2019-20 या आर्थिक वर्षात Purchase of Computers या लेखाशीर्षाखाली रु. 50 लाख तरतूद करण्यात आली असल्यामुळे 50 लाखांपर्यंत खरेदी करावी उर्वरीत खरेदी पुढील आर्थिक वर्षात करावी वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

7) विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या स्कुल कौन्सिलची बैठक दि. 22 ऑगस्ट 2019 रोजी बैठक क्र. 52 विषय क्र. – बी-1/एफ- 175/2019/14 या विषयानुसार बी.एड.शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क वाढीबाबत.

**वित्त समिती ठराव क्र.** 14.4.5 – शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या बी.एड. शिक्षणक्रमाचे प्रवेश प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गासाठी व राखीव प्रवर्गासाठी असे दोन दरामध्ये न आकारता सर्व प्रवर्गासाठी एकच दर रु.800/- प्रमाणे शुल्क आकारणी करावी त्यास मंजुरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** -शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या बी.एड. शिक्षणक्रमाचे प्रवेश प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गासाठी व राखीव प्रवर्गासाठी असे दोन दरामध्ये न आकारता सर्व प्रवर्गासाठी एकच दर रु.800/- प्रमाणे शुल्क आकारणी करण्याच्या वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

8) माहे ऑगस्ट 2019 अखेरपर्यंतचा गुंतवणुक अहवाल –

**वित्त समिती ठराव क्र.** 14.4.6- गुंतवणुक अहवालाची नोंद घेण्यात आली. त्यास मंजुरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.

**व्यवस्थापन मंडळ ठराव**-गुंतवणुक अहवालाची व्यवस्थापन मंडळाच्यावतीने नोंद घेण्यात आली.

9) विद्यापीठाचे अंतर्गत Centre of Collaboration & Special Initiative या केंद्राचे सन 2019-20 च्या आर्थिक तरतुदीबाबत

**वित्त समिती ठराव क्र.** 14.5.2- Centre of Collaboration & Special Initiative या केंद्रासाठी सन 2019-20 या आर्थिक वर्षापासून नवीन आर्थिक तरतुदीस कार्योत्तर मंजुरीसाठी व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - Centre of Collaboration & Special Initiative या केंद्रासाठी सन 2019-20 या आर्थिक वर्षापासून नवीन आर्थिक तरतुदीस वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

10) विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण व बहिशाल शिक्षण सेवा केंद्रातर्गत विद्यापीठातर्फे विभागीय क्रीडा स्पर्धाच्या आयोजन करण्यात येत असून येणा-या खर्चास मंजुरीस्तव सादर

**वित्त समिती ठराव क्र.** 14.5.3 - विद्यार्थी कल्याण व बहिशाल शिक्षण सेवा केंद्रातर्गत विद्यापीठातर्फे विभागीय क्रीडा स्पर्धाच्या आयोजनासाठी रु. 57,27,700/- इतक्या खर्चास मजुरीसाठी व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यार्थी कल्याण व बहिशाल शिक्षण सेवा केंद्रातर्गत विद्यापीठातर्फे विभागीय क्रीडा स्पर्धाच्या आयोजनासाठी रु. 57,27,700/- इतक्या खर्चास वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

11) विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण व बहिशाल शिक्षण सेवा केंद्र अंतर्गत विभागीय केंद्रीय युवक महोत्सव व सराव शिबीरासाठी येणा-या खर्चास वित्त समितीच्या मंजुरीस्तव सादर

**वित्त समिती ठराव क्र.** 14.5.4 - विद्यापीठाचे विभागीय केंद्रीय विद्यार्थी कल्याण व बहिशाल शिक्षण सेवा केंद्र अंतर्गत विभागीय केंद्रीय युवक महोत्सव व सराव शिबीरासाठी येणा-या एकूण रु.40,80,300/-इतक्या मंजुरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाचे विभागीय केंद्रीय विद्यार्थी कल्याण व बहिशाल शिक्षण सेवा केंद्र अंतर्गत विभागीय केंद्रीय युवक महोत्सव व सराव शिबीरासाठी येणा-या एकूण रु.40,80,300/-इतक्या खर्चास वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

12) विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांच्या सर्व शिक्षणक्रमांचे परीक्षा शुल्क सुधारणा करणेबाबत

**वित्त समिती ठराव क्र.**14.6.1 – परीक्षा शुल्क पुर्ननिर्धारण समितीच्या शिफारशी विचारात घेऊन वित्त समितीने नव्याने प्रवेशित विद्यार्थी (प्रवेश शुल्क) तसेच पुवर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे प्रतिविषय/ पेपर परीक्षा शुल्क निर्धारणाची शिफारस केली

1)पदविका / पदवी – रु. 130/- प्रति विषय

2)पदव्युत्तर पदवी,प्रोफोशनल, टेक्निकल सायनव्स अँड टेक्नॉलजी विषयासांठी – रु. 150/- प्रति विषय

| | | |
|---|---|---|
| | | 3) तांत्रिक शिक्षणक्रम उत्तरपुस्तिका मुल्यमापन सध्याचे रु. 50/- प्रति पेपर ऐवजी रु. 20/- प्रति उत्तरपुस्तिका करण्यात यावे.<br>4) प्रॅक्टीकल/ स्टुडिओ वर्क— रु. 200/- प्रति विषय / पेपर<br>5) प्रोजेक्ट वर्क— रु. 300/- प्रति विषय / पेपर<br>6) मार्कलिस्ट प्रती वर्ष / सेमिस्टर— रु. 100/- प्रति मार्कलिस्ट<br>7) ड्युप्लिकेट मार्कलिस्ट / पासिंग— रु. 200/- प्रति मार्कलिस्ट<br>8) ड्युप्लिकेट पदवी / पदविका प्रमाणपत्र— रु. 300/- प्रति मार्कलिस्ट<br>वरीलप्रमाणे शुल्क आकारण्यात यावी मंजुरीसाठी व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - परीक्षा शुल्क पुर्ननिर्धारण समितीच्या शिफारशी विचारात घेऊन वित्त समितीने नव्याने प्रवेशित विद्यार्थी (प्रवेश शुल्क) तसेच पुर्वपरीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे प्रतिविषय/ पेपर परीक्षा शुल्क निर्धारणाची शिफारस केली<br>1)पदविका / पदवी — रु. 130/- प्रति विषय<br>2)पदव्युत्तर पदवी,प्रोफोशनल, टेक्निकल सायनव्स अँड टेक्नॉलजी विषयासांठी — रु. 150/- प्रति विषय<br>3) तांत्रिक शिक्षणक्रम उत्तरपुस्तिका मुल्यमापन सध्याचे रु. 50/- प्रति पेपर ऐवजी रु. 20/- प्रति उत्तरपुस्तिका करण्यात यावे.<br>4) प्रॅक्टीकल/ स्टुडिओ वर्क— रु. 200/- प्रति विषय / पेपर<br>5) प्रोजेक्ट वर्क— रु. 300/- प्रति विषय / पेपर<br>6) मार्कलिस्ट प्रती वर्ष / सेमिस्टर— रु. 100/- प्रति मार्कलिस्ट<br>7) ड्युप्लिकेट मार्कलिस्ट / पासिंग— रु. 200/- प्रति मार्कलिस्ट<br>8) ड्युप्लिकेट पदवी / पदविका प्रमाणपत्र— रु. 300/- प्रति मार्कलिस्ट<br>वरीलप्रमाणे शुल्क आकारण्याच्या वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | | 13) विद्यापीठाचे सन 2014-15 पर्वीचे Bank Balances मधील फरक General Reserves किंवा Susspense Account मध्ये दर्शविण्यात मंजुरीबाबत<br>**वित्त समिती ठराव क्र.14.7.1** - विद्यापीठाचे लेखापरिक्षक मे.सगदेव अंड कंपनीचे सी.ए. श्री संजीवन ताबुलबाटीकर यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सन 2014-15 पुर्वीचे Bank Balances मधील फरक General Reserves किंवा Susspense Account मध्ये दर्शविण्यास मंजुरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** -विद्यापीठाचे लेखापरिक्षक मे.सगदेव अंड कंपनीचे सी.ए. श्री संजीवन ताबुलबाटीकर यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सन 2014-15 पुर्वीचे Bank Balances मधील फरक General Reserves किंवा Susspense Accountमध्ये दर्शविण्याच्या वित्त समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली |
| 170.4.0 | | **कार्योत्तर मान्यतेसाठी विषय** |
| | 170.4.1 | विद्यापीठातील नियमित कर्मचा-यांना ओपीडी व आयपीडी सेवा पुरविणेसाठी श्री.गुरूजी रूग्णालय,नाशिक यांना मुदतवाढ देण्याची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — श्री.गुरूजी रुग्णालय, नाशिक यांच्याशी विद्यापीठाने पुर्वी केलेल्या करारानुसार विद्यापीठातील नियमित कर्मचा-यांना ओपीडी व आयपीडी सेवा पुरविणेसाठी कराराची मुदत मेडिक्लेम योजना सुरु होईपर्यंत वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली |
| | 170.4.2 | विद्यापीठातील विविध विभागीय केंद्रावरील करारावरील वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार,विविध विद्याशाखेतील करारावरील संयोजक(शैक्षणिक)यांच्या पुर्ननियुक्तीबाबतची बाब व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील विविध विभागीय केंद्रावरील करारावरील वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार,विविध विद्याशाखेतील करारावरील संयोजक(शैक्षणिक)यांच्या |

| | | |
|---|---|---|
| | | पुर्ननियुकतीस मा.कुलगुरु यांनी मान्यता दिली आहे त्याची नोंद घेण्यात आली. |
| | 170.4.3 | विद्यापीठास NAAC Accredation घेण्यासाठी Internal Quality Assurance Cell तयार करणेबाबत केलेल्या कार्यवाहीची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठास NAAC Accredation घेण्यासाठी Internal Quality Assurance Cell तयार करणेबाबत मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| | 170.4.4 | विद्यापीठातील शिक्षकांना UGC ने निर्गमित केलेल्या आदेशानुसार सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत केलेल्या कार्यवाहीची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील शिक्षकांना UGC ने निर्गमित केलेल्या आदेशानुसार सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत मा.कुलगुरुंनी दिलेल्या मान्यतेनुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| | 170.4.5 | विद्यापीठातील शिक्षकांना करीयर अँडव्हान्समेट योजनेचे लाभ लागू करणेबाबत केलेल्या कार्यवाहीची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील शिक्षकांना करीयर अँडव्हान्समेट योजनेचे लाभ लागू करणेबाबत मा.कुलगुरूंनी दिलेल्या मान्यतेनुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| 170.5.0 | | **ऐनवेळचे विषय** |
| | 170.5.1 | विद्यापीठातील शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू न झाल्यामुळे इंटेरीयम देण्याबाबत.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - वरील विषयाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. आशिष पातुरकर व डॉ. अनिल कुलकर्णी यांनी महाराष्ट्र शासनाने अजुनही महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही यासाठी एक महिन्यात शासनाकडून शासन निर्णय निर्गमित होण्याची कार्यवाही अपेक्षित आहे असे नमूद केले. परंतू एक महिन्यात शासन निर्णय निर्गमित न झाल्यास इंटेरियम देण्याबाबतचा विचार पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत करण्यात येईल असे ठरले |
| | 170.5.2 | परीक्षा नियंत्रक व संचालक, मूल्यमापन विभाग यांच्या कामाच्या जबाबदारीबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - परीक्षा नियंत्रक व संचालक, मूल्यमापन विभाग यांच्या कामाच्या जबाबदारीबाबत योग्य तो निर्णय घेण्याबाबतचा अधिकार मा. कुलगुरू यांना आहे. त्यानुसार मा. कुलगुरू यांनी कार्यवाही करावी असे ठरले. |
| | 170.5.3 | संचालक पदाबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठ कायदा **The Second Schedule-Statutue of the University**(Section 24 मधील मुद्दा क्र. 03) नुसार संचालक पदाबाबत परिनियम करण्यात आलेला आहे. परंतू त्यामध्ये दुरूस्ती करावयाची असल्यास तशी दुरूस्ती करून सदरील परिनियम व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मांडण्यात येऊन त्याची मंजूरी घेऊन मा. राज्यपाल कार्यालयाकडे पाठविण्यात यावा असे ठरले. |
| | 170.5.4 | डॉ.प्रकाश आण्णासाहेब देशमुख यांनी दि. 6.7.2019 ते 13.7.2019 या कालावधीतआंतररुग्ण घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले रु.3,74,157/- चे देयक अदा देण्याबाबतची बाब विचारार्थ<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - डॉ .प्रकाश आण्णासाहेब देशमुख यांनी दि. 6.7.2019 ते 13.7.2019 या कालावधीत आंतररुग्ण घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले रु.3,74,157/- चे देयक अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ